RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक २२] मंगळवार, फेब्रुवारी २२, २०२२/फाल्गुन ३, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक २१ फेब्रुवारी २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक जिपंनि २०२१/प्र.क्र.१०८/पं.रा.-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कारवाई करणे आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम २७४ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये या नियमांच्या पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीचा अवलंब न करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (तीन) तसेच कलम १४ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) (*सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ याच्या नियम २अ मधील,—

(एक) उप-नियम (१) मध्ये, " संख्या पंचाहत्तरपेक्षा अधिक व पन्नासपेक्षा कमी " या मजकुराऐवजी, " संख्या पंच्याऐंशीपेक्षा अधिक व पंचावन्नपेक्षा कमी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-नियम (३) मध्ये, " पन्नास " याऐवजी " पंचावन्न " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) उप-नियम (४) मध्ये,—

(अ) विद्यमान सूत्राऐवजी, पुढील सूत्र दाखल करण्यात येईल :—

$$\text{“}\frac{\text{क्ष-य}}{\text{३०}}\text{”};$$

(ब) संख्या व शब्दांत “मतदार विभागांची संख्या ७५” ही संख्या व मजकूर याऐवजी “मतदार विभागांची संख्या ८५” ही संख्या व मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रविण जैन,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,Fort,
Mumbai 400 001, Dated the 21st February 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHAD AND PANCHAYAT SAMITI ACT, 1961.

No. ZPE-2021/CR-108/PR.2.— Whereas, the Government of Maharashtra is satisfied that the circumstances exist which rendered it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Zilla Parishads (Electoral Colleges and Conduct of Election) Rules, 1962 and to dispense with the condition of previous publication of these rules under the proviso to sub-section (*3*) of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (iii) of sub-section (*2*) of section 274 read with section 14 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Elections Rules,) as follows :—

1. These rules may be called the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Election) (*Amendment) Rules, 2022.

2. In rule 2A of the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Election) Rules, 1962,—

(*i*) in sub-rule (1), for the words " Seventy-Five and not less than fifty in number " words " eighty –five and not less than fifty-five in number " shall be substituted ;

(*ii*) in sub-rule (3), for the word " fifty " the word " fifty five " shall be substituted ;

(*iii*) in sub-rule (4),—

(*a*) for existing formula the following formula shall be substituted, namely :—

$$\text{“}\frac{X-Y}{30}\text{”};$$

(*b*) for the numbers and words "75 electoral divisions" the numbers and words " 85 electoral divisions " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAVIN JAIN,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.